पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांस परवानगी देण्यासाठीच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः व्हीओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४,**

**मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला,**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक : १० मे, २०१८.**

**संदर्भ :**

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०११/११४७/प्र. क्र. ५/व्यशि-४, दिनांक १३/१/२०११

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/ व्हीओसी/२०१७/२२३, दिनांक २२/११/२०१७.

३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/ व्हीओसी/सुधारित एसओपी/२०१८/१२, दिनांक ३०/१/२०१८.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण करणे व माध्यमिक कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने **V-१ मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख** (Introduction to Basic Technology-IBT), **V-२ अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची मुलभूत तत्वे** (Elements of Mechanical Engineering-EME) **व V-३ विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानाची मुलभूत तत्वे** (Elements of Electrical and Electronics Technology-EET) हे तीन बहुकौशल्ययुक्त पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम **१९९६-९७** पासून सुरु करण्यात आले आहेत सदर अभ्यासक्रम राज्यांमध्ये शासकीय संस्था, अशासकीय अनुदानीत संस्था व अशासकीय विनाअनुदानीत संस्थेत राबविण्यात येतात. सध्याच्या बदलत्या तंत्रज्ञानामुळे व शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोणातून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने National Skill Qualification Framework (NSQF) विकसित केले असून प्रत्येक स्तरावर ज्ञान व कौशल्य आत्मसात करावयाचे स्तर ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार नवीन अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली आहेत. NSQF च्या धोरणानुसार Pandit Sundarlal Sharma Central Institute for Vocational Education (PSSCIVE), Bhopal यांनी सध्याच्या बदलत्या तंत्रज्ञानाबाबत संशोधन करुन येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करुन नवीन पुनर्रचित पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम तयार केले आहेत. सदर

अभ्यासक्रम संपुर्ण देशात सुरु करण्यास मान्यता मिळाली असून त्यानुसार महाराष्ट्र शासनाने NSQF धोरणांवर आधारित PSSCIVE, भोपाळ यांनी पुनर्रचित केलेले V-१. Multiskill Foundation Course, V-२. Mechanical Technology, V-३.Electrical Technology, V-४.Electronics Technology , V-५.Automobile Technology ,V-६.Retail Management ,V-७.Health Care ,V-८.Private security व V-९.Information Technology हे नऊ पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम राज्यामध्ये २०१७-१८ पासून सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

२. डॉ.कोठारी आयोगाच्या १९६४ च्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने १९७८-७९ पासून राज्यात व्यवसाय विषयांची ३०% व्याप्ती असलेले, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांत आले आहेत. सद्य:स्थितीत तांत्रिक / वाणिज्य / कृषी / मत्स्य या गटातील एकूण १६ व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येतात. सदर अभ्यासक्रम घेणा-या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेशाच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर अभियांत्रिकी शाखेमधील पदविकेच्या (Diploma) व्दितीय वर्षामध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध असल्यामुळे या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद आहे.

३. केंद्र शासनाच्या १९८६ च्या नविन शैक्षणिक धोरणानुसार +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण देऊन जास्तीत जास्त युवकांना रोजगार /स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने राज्यात १९८८-८९ पासुन ७०% व्यवसाय शिक्षण व ३०% सामान्य शिक्षण अंतर्भूत असलेले किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. सदर अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाभिमुख असल्याने विद्यार्थ्यांना संबधित व्यवसायाशी निगडीत किमान कौशल्य प्राप्त करुन स्वत:चा उद्योग सुरु करावा अथवा औद्योगिक आस्थापनांमध्ये नोकरी करावी आणि उच्च शिक्षणाकडे जाणारा लोंढा कमी व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २/३/२००९ अन्वये किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाचे नाव बदलण्यात आले असून ते उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational) असे करण्यात आले आहे.

४. सद्य:स्थितीत वरील संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३/१/२०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यांकरिता परवागनी देण्यासाठी इच्छूक संस्थांमार्फत विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, प्रादेशिक, सहसंचालक यांचे स्तरावरुन छाननी करुन प्रस्ताव व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास प्राप्त होतात. राज्यातील सर्व प्रादेशिक कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची संचालनालयास्तरावर समिती गठीत करुन निश्चित करण्यात आलेल्या मानकानुसार छाननी करण्यांत येते.

परिपूर्ण प्रस्ताव असणा-या संस्थांचे अर्ज शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी शासनास सादर करण्यांत येतात. त्रुटी असलेल्या प्रस्तावाबाबत संबंधित संस्थांना संचालनालयाव्दारे प्रादेशिक कार्यालयामार्फत त्रुटी पूर्तता करण्यासाठी संधी देण्यांत येते. या विषयाबाबत विविध टप्प्यावरील अवलंबिलेल्या कार्य प्रक्रियेकरीता बराच कालावधी व्यतीत होत असतो. विविध स्तरावर मोठया प्रमाणात रिक्त असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची संख्या पाहता उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत कालमर्यादेत कार्यवाही पार पाडण्यास मर्यादा येतात.

५. भारत सरकार यांचे मेक इन इंडिया आणि स्कील इंडिया या योजना सुरु असून "कौशल्य विकास कार्यक्रम" या महत्वकांक्षी योजनेंतर्गत देशामध्ये २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याचे उदिष्टये आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य कुशल महाराष्ट्र हे धोरण राबवत असून सन २०२२ पर्यंत राज्यामध्ये ४.५ कोटी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचे उदिष्टये राज्याने संकल्पित केलेले आहे.

६. सद्य:स्थितीत राज्यातील शासकीय/अशासकीय संस्थामधील माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायीक अभ्यासक्रमांतर्गत एकूण **३६३** संस्थामधून **६३,४८०** इतकी प्रवेशक्षमता उपलब्ध आहे. **+२** स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाअंतर्गत राज्यात एकूण **१०२८** संस्थामधून **१,११४५०** इतकी प्रवेश क्षमता उपलब्ध आहे, **+२** स्तरावरील उच्च माध्यमिक **२०** व्यवसाय अभ्यासक्रमाच्या शासकीय व अशासकीय अशा एकूण **१०८८** संस्थामधून **८१,८२५** इतकी प्रवेशक्षमता आहे. राज्यातील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या विविध संस्थामधील प्रवेश क्षमता पुढील पाच वर्षामध्ये **पाच लाख** इतकी वाढविण्याचे उदिष्टय आहे. त्याकरीता नवीन खाजगी व्यवसाय अभ्यासक्रम /विद्यमान खाजगी व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांची प्रवेश क्षमता जलद गतिने वाढविणे गरजेचे आहे याकरिता पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याच्या सदंर्भातील सध्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करुन माहिती व तंत्रज्ञान या माध्यमाचा प्रभावीपणे वापर करून या संदर्भातील कार्यपध्दत कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन त्याबाबतच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस (SOP) मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालक (व्यशि प्रशि) यांनी वरील संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी वरील संदर्भ क्र. १ येथील दि. १३/१/२०११ च्या शासन निर्णय अधिक्रमित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दि. १३/१/२०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन संचालक (व्यशि प्रशि) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

शासन आता याव्दारे, वरील संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३/१/२०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे :-

१. पूर्व व्यवसायीक अभ्यासक्रम सुरु करणे, **+२** स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यासाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** येथील ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस (SOP) मान्यता देण्यांत येत आहे.

२. स्थानिक औद्योगिक आस्थापनांच्या गरजेनुसार जिल्हातील उद्योगधंदयाला आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची निश्चिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१ यांचे स्तरावरुन करण्यात यावी.

३. जिल्हानिहाय/व्यवसाय निहाय पुढील पाच वर्षाचा मनुष्यबळ विकासाचा बृहत आराखडा (Master Plan) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१ यांचे स्तरावरुन तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

४. माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे व +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे अशा संस्थांना मान्यता देणे /विद्यमान संस्थामध्ये व्यवसाय बदल, तुकडी वाढ इ.करीता प्रत्यक्ष निरीक्षण करणेसाठी Certified Agency ची निवड संचालनालय स्तरावरुन करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१८०५१०१४५९३७३८०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2018.05.25 12:56:08 +05'30'

**सोबत:- परिशिष्ट "अ"**

**( संतोष वि. रोकडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव
५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१
६) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग),(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

७) सर्व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

८) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)

**प्रत :-**

१) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक.

४) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.

५) उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

६) निवड नस्ती (व्यशि-४).

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,शासन निर्णय क्र.व्हिओसी-२०१७/प्र. क्र.१५७/व्यशि-४, दिनांक :- १० मे, २०१८ चे सोबतचे परिशिष्ट – "अ"

*******************************************************************************

## पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्यासाठीची ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दती (Standard Operating Procedure – SOP)

**१. अर्ज मागविण्यांसाठी जाहिरात देणे:**

१.१ **कायम विनाअनुदान तत्त्वावर माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायीक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे आणि +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे** याकरीता शासन मान्यता मिळण्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया Online करण्यांत आली असून इच्छुक अर्जदार संस्थांकडून अर्ज मागविण्याकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील नवीन प्रक्रियेबाबत सर्वाधिक खप असलेल्या २ वर्तमान पत्रात वर्षातून एकदा जाहिरात प्रकाशित करण्यात येईल. तसेच सर्व प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, यांचे मार्फत नवीन कार्यपध्दती व्यापक प्रसिध्दी करण्यात येईल.

१.१ जाहिरात, प्रमाणित कार्यपध्दती, माहिती पुस्तिका, निर्गमित केलेले निकष/माहिती, इ. संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dvet.gov.in) उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२. अर्ज करणे:**

२.१ पात्रता प्राप्त खाजगी संस्था वर्षभर संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dvet.gov.in) ऑनलाइन स्वरुपात अर्ज करतील.

२.२ **अर्जदार संस्थांची पात्रता:**

२.२.१ संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत/पंजीकृत असणे आवश्यक आहे.

२.२.२ पूर्व माध्यमिक स्तरावरील व्यवसायिक अभ्यासक्रमाची मागणी करणाऱ्या संस्थांकडे इयत्ता ९ वी व १० वी करीता शालेय शिक्षण विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

२.२.३ +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांची मागणी करणाऱ्या संस्थांकडे इयत्ता ११ वी व १२ वी करीता शालेय शिक्षण विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

२.२.४ +२ **स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम** सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ११ वीचे उच्च माध्यमिक वर्ग/उच्च शिक्षण विभागातंर्गत महाविद्यालयीन वर्ग सुरु करण्यास अनुक्रमे शालेय शिक्षण विभागाची अथवा उच्च शिक्षण विभागाची मान्यता असल्यासच अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल.

वरिल प्रमाणे लागु असलेले दस्ताऐवज ऑनलाइन अर्जासोबत Upload करणे.

**२.३ व्यवसाय अभ्यासक्रमाची निवड:**

Online अर्ज करतेवेळी अर्जदाराने आवश्यक आहे त्या व्यवसायांची निवड करुन नोंद करणे आवश्यक आहे.

२.३.१ नवीन व्यवसाय व तुकडी वाढ करतांना संबंधित जिल्हातील औद्योगिक आस्थापनाची निकड व सद्य:स्थितीत जिल्हातील व्यवसाय अभ्यासक्रम निहाय उपलब्ध असलेल्या जागा यबाबी विचारात घेऊन जिल्हयाकरीता पुढील पाच वर्षाचा मनुष्यबळ विकास बृहत आराखडा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dvet.gov.in) प्रकाशित करण्यात येईल. जिल्हयाच्या बृहत आराखडयानुसार **माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायीक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम आणि +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम** यांची यादी देण्यात येईल. त्यानुसार अर्जदार संस्था उपलब्ध व्यवसाय अभ्यासक्रमांची निवड करतील.

२.३.२ जिल्हयाच्या बृहत आराखडयानुसार उपल्बध व्यवसाय अभ्यासक्रमांच्या मागणीसाठी जिल्हानिहाय व्यवसाय अभ्यासक्रमांच्या उपलब्ध (Upper Limite of seats) जागा संचालनालयामार्फत घोषित करण्यात येतील. ११०% मर्यादेपर्यंत उपलब्ध जागा automated विचारात घेतल्या जातील. एकाच व्यवसाय अभ्यासक्रमासाठी ११०% च्या वर मागणी आल्यास त्यासंदर्भाचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल.

२.३.३ विद्यमान संस्थातील व्यवसाय अभ्यासक्रमा बाबत क्षमताविस्तार करतांना देखिल वरील आकृतीबंधा प्रमाणे विस्तार करणे आवश्यक राहील.

**३. अभ्यासक्रमांच्या मान्यतेच्या अटी व शर्ती**

१.१ महाराष्ट्र राज्य शासन मान्यता प्राप्त शालेय शिक्षण विभागाची शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सुरु करावयाचे परवानगीचे पत्र (शिक्षण उपसंचालक यांचे प्रथम खाते मान्यता पत्र)

१.२ विहित पायाभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. (स्वतंत्र बांधकाम,यंत्रसामुग्री, विद्युत पुरवठा)

१.३ संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या वा अन्य तक्रारी नसाव्यात

१.४ संस्था मुंबई सार्वजनिक विश्वसत अधिनियम १९५० व संस्था अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत/पंजीकृत असणे आवश्यक आहे.

१.५ संस्थेत सद्य:स्थितीत सुरु असलेल्या कनिष्ठ महाविद्यालये,शाळा व इतर अभ्यासक्रमांची यादी सादर करावी लागेल.

१.६ शासनाकडून संस्था ताब्यात घेणेबाबत व तत्सम बाबतीत कोणतेही न्यायालयीन प्रकरणे प्रलबिंत नसावे.

१.७ संस्थेत अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी ही कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर देण्यात येईल व भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही. यासंबंधीचा सोसायटीच्या ठरावाची प्रत (रु.१००/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.)

१.८ संस्थेने विहित मानकांनुसार आवश्यक कर्मचारी/ शिक्षक नियमित वेतनश्रेणीत नेमण्याबाबतचा ठराव सादर करणे आवश्यक राहील.

१.९ संस्थेकडे अभ्यासक्रमास आवश्यक असणारे मानकांप्रमाणे सर्व प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करण्याबाबतचा ठराव व राष्ट्रीयकृत बँकेचे बँक बॅलेन्स प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्यापूर्वीच्या ३ महिन्याच्या कालावधीतील) सादर करणे आवश्यक राहील.

१.१० अभ्यासक्रमांस मंजुरी दिल्यानंतर कर्मचारी वर्गाची सेवाविषयक व वेतन विषयक संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

१.११ अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो विनाअट व विनाविलंब अमंलात आणण्याची हमी संस्थेस द्यावी लागेल.

१.१२ प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेक्षाची संख्या सतत ३ वर्ष मंजूर क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी असल्यास अभ्यासक्रमांची मान्यता काढून घेण्यात येईल.

१.१३ माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ९ वीचे माध्यमिक स्तरावरील वर्ग सुरु करण्यास शालेय शिक्षण विभागाची मान्यता असल्यासच सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल.

१.१४ +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ११ वीचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्यास मान्यता असल्यासच एका तुकडीस एक व्यवसाय अभ्यासक्रमांस परवानगी देण्यात येईल.

१.१५ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता शालेय शिक्षण विभागातंर्गत इयत्ता ११ वीचे उच्च माध्यमिक वर्ग/उच्च शिक्षण विभागातंर्गत महाविद्यालयीन वर्ग सुरु करण्यास अनुक्रमे शालेय शिक्षण विभागाची अथवा उच्च शिक्षण विभागाची मान्यता असल्यासच अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल तसेच तांत्रिक,अर्ध वैद्यकीय,कृषी, मस्त्य व गृहशास्त्र गटासाठी जर उद्योगांनी,हॉस्पिटले, कृषी संशोधन

केंद्र,मत्स्य सोसायटी,व मोठे हॉटेल्स किंवा नामांकित टुरीस्ट कंपन्यानी अर्ज केल्यास त्यांचा गुणवत्तेवर विचार केला जाईल. त्याकरीता त्यांना आवश्यक करार सादर करणे बंधनकारक राहील.

१.१६ सर्व संस्थांचे बाबतीत जागा/पाणी/विजपुरवठा/प्रसाधनगृहे इ.मुलभूत सुविधा उपलब्ध असल्याशिवाय परवानगी देण्यात येणार नाही.

१.१७ परवानगी प्राप्त झाल्यानंतर संस्थेला माध्यमिक शाळा सहिता व एम.ई.पी.एस. नियम १९८१ नुसार आवश्यक ते सर्व लेखे संस्था स्तरावर ठेवणे बंधनकारक राहील.

१.१८ संस्थेने माध्यमिक शाळा सहितेतील नियमांचे पालन न केल्यास अथवा शासनाने व संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे, परिपत्रकाचे पालन न केल्यास संस्थेची मान्यता तात्काळ रद्य करण्यात येईल.

१.१९ मान्यता प्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरु न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमांत सतत ३ वर्ष विद्यार्थी प्रवेश न झाल्यास सदर अभ्यासक्रमाची मान्यता अपोआप संपुष्टात येईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१.२० जागा मालकीची असल्यास मालकीबाबतचे पुरावे (उदा. ७/१२ चा उतारा जोडणे आवश्यक राहील.)

१.२१ जागा भाडयाची असल्यास जागेचे भाडेकरार पत्र ५ वर्ष कालावधीकरीता आणि दुय्यम सहाय्यक निबंधकाकडे नोंदणीकृत केलेले असणे आवश्यक राहील.

१.२२ इमारत बांधकामास स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेली असावी, तसेच इमारत बांधकाम नकाशा शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांने प्रमाणित व चिन्हाकिंत केलेला असणे आवश्क आहे.

१.२३ अर्ज करतेवेळी संस्थांनी चालू अभ्यासक्रमांसाठी मानकांप्रमाणे जागा व स्थळ दर्शक वास्तूविशारद तज्ञांनी साक्षाकिंत केलेला नकाशा व प्रस्तावित नवीन सुरु करावयाची अभ्यासक्रमांसाठी प्रस्तावित जागा स्वतंत्रपणे (क्लास रुम आणि प्रयोगशाळा) स्थळ दर्शक नकाशा सादर करणे आवश्यक आहे. नवीन बांधकाम प्रस्तावित असेल तर तसे नमूद करुन स्थळ दर्शक नकाशा सादर करणे आवश्यक आहे.

१.२४ विद्युतभारासाठी मिटर सिलिंग रिपोर्ट व मागील ३ महीन्याचे मंजुर विद्युतभार (KW) दर्शविणारे विजेचे देयक जोडणे आवश्यक राहील.(व्यवस्थापनाच्या/प्रस्तावित संस्थांच्या नावाने विजदेयक असणे आवश्यक आहे.)

१.२५ ज्या अभ्यासक्रमांस शेतकी जागा आवश्यक आहे त्याच्या मालगी हक्काचे पुरावे, ७/१२ उतारा,सोसायटी किंवा संस्थेच्या नावावर असणे आवश्यक आहे. शेतकी जागेत पाणी उलब्धतेबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१.२६ शेतजमीन भाडयाची असेल तर विद्युत मिटर संस्था/ सोसायटीच्या नावावर असणे आवश्यक आहे किंवा जागा मालकाचे विद्युत मिटर वापरण्यासाठीचा रु.१००/- स्टॅम्प पेपरवर करार नामा आवश्यक राहील.

वरील सर्व बाबींची पूर्तता करित असल्याच्या पृष्ठर्थ कागदपत्रे/दस्ताऐवज ऑनलाईन अर्ज करतेवेळी करणे Upload अनिवार्य आहे.

## ४. अर्ज प्रक्रिया व नोंदणी शुल्क:

४.१ प्रस्तावित नवीन कार्यपध्दतीमध्ये Online अर्ज करतेवेळी खालीलप्रमाणे आवश्यक शुल्काचा भरणा करणे.

४.१.१ अर्ज प्रक्रिया शुल्क = रु.२०००/-

४.१.२ प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमासाठी प्रती तुकडी शुल्क =रु. १००००/- प्रति तुकडी)

४.२ वरील प्रमाणेचे शुल्क “महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद” - सोसायटीच्या बॅक खात्यात जमा करणे व शुल्क जमा केल्याची पावती ऑनलाईन अर्जासोबत Upload करणे

## ५ प्रत्यक्ष पडताळणी-(Physical Verification)

**५.१** संबंधित पात्रताधारक अर्जदार संस्था व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर अर्ज करत असताना संबंधित अर्जाबरोबर पात्रता सिध्द करणेसाठी आवश्यक असलेले दस्ताऐवज/कागदपत्र ऑनलाईन स्वरुपात अपलोड करतील.

**५.२** सदर अर्जाची व कागदपत्राची परिपूर्तता तपासण्याच्या उद्देशाने संगणकीय प्रणालीव्दारे प्राथमिक छाननी करण्यात येईल.

**५.३** प्राथमिक छाननी झालेल्या अर्जांची संगणकिय प्रणालीव्दारे प्रत्यक्ष निरीक्षणाकरीता शिफारस करण्यात येईल.

**५.४** प्राथमिक छाननीमध्ये पात्र असलेल्या अर्जदारांची प्रत्यक्ष निरिक्षणाकरिता नेमण्यात आलेल्या निरीक्षण Agency पैकी संगणकीय प्रणालीव्दारे एका निरिक्षण Agency ला निरीक्षणाकरिता निर्धारित करण्यात येईल.

५.५ निर्धारीत केलेली निरीक्षण Agency ४८ तासाच्या आत निरीक्षणाकरीता ऑनलाईन स्वीकृती (Online Acceptance) देईल. अन्यथा संगणक प्रणालीव्दारे निरीक्षणाकरीता अन्य निरीक्षण Agency निर्देशित (Designate) करण्यात येईल.

५.६ निरीक्षण Agency त्यांना निरीक्षणाकरीता निर्देशित झालेल्या संस्थांचे संस्थानिहाय निरीक्षण करण्याकरिताचे वेळापत्रक संकेतस्थळावर अपलोड (Inspection Schedule) करतील.

५.७ संबंधित निरिक्षण Agency प्रत्यक्ष निरिक्षणाव्दारे आपले प्रत्येक बाबनिहाय अभिप्राय ३० दिवसाच्या आत पोर्टलवर नोंदवतील. या निरीक्षण अहवालाच्या आधारे संगणक प्रणालीव्दारे संस्थेस स्विकृती प्रमाणपत्र (Letter of Acceptance) अथवा नकार प्रमाणपत्र (Letter of Rejection) निर्गमित करण्यात येईल.

५.८ निरीक्षण Agency ने निरिक्षण केलेल्या संस्थांपैकी १०% संस्थांची संगणकीय प्रणालीव्दारे randomly निवड करण्यात येऊन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत संबंधित संस्थांचे पुर्नःनिरीक्षण करण्यात येईल.

## ६ शासन निर्णय निर्गमित करणे

६.१ अर्जदार संस्थांचे सादर केलेल्या कागदपत्र /दस्ताऐवज व प्रत्यक्ष निरिक्षण अहवालाच्या आधारे संगणक प्रणालीव्दारे राज्य शासनाची मान्यता (Letter of Approval) देण्यात येईल.

## ७ नाकारलेल्या अर्जावरील कार्यवाही

७.१ कागदपत्राच्या प्राथमिक छाननी व प्रत्यक्ष निरिक्षणात नाकारलेले अर्ज वार्षिक मुदतीत ग्राहय धरण्यात येतील. यासाठी अर्जदारास खालील प्रमाणे शुल्क भरुन ऑनलाईन प्रणालीमार्फत पूर्वी सादर केलेला अर्ज पुनःश्च ग्राहय धरण्यासाठी अर्ज करावा लागेल. तसेच शासनाने वेळोवेळी सदर प्रवेश प्रक्रिया, प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क यांमध्ये केलेले बदल सर्व संस्थांना बंधन कारक राहतील.

७.१.१ पुनःश्च अर्ज प्रक्रिया शुल्क = रु. २,०००/-

**७.१.२** नोंदणी शुल्क = रु. २,०००/- प्रति तुकडी

पूर्वीच्या अर्जातील तुकडया व्यतिरिक्त इतर तुकडयांसाठी मुद्या क्र. ४.१.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क भरावे लागेल.

७.२ तथापि पुनःश्च त्रुटी पूर्ततेच्या मुदतीत त्रुटी पूर्ण न करु शकलेल्या, दस्ताऐवजांच्या आधारे नाकारलेले अर्ज तसेच निरिक्षण समितीने नाकारलेले अर्ज करण्याच्या वार्षिक मुदतीत पुनःश्च अर्ज न केलेले अर्ज कायमचे बाद ठरविण्यात येतील.

**७.३** अशा बाद ठरविण्यात आलेल्या अर्जावर कुठल्याही प्रकारची पुन:श्च कार्यवाही करण्यात येणार नाही, अथवा त्रुटी कळवून त्याची पूर्तता करुन घेण्यात येणार नाही. सदर अर्ज रद्द ठरवून तो दप्तरी दाखल करण्यात येईल. तसेच या अर्जाकरिता भरलेले अर्ज प्रक्रिया शुल्क व नोंदणी शुल्क फक्त त्या अर्जापूरतेच मर्यादित असल्याने ते संस्थेस परत मिळणार नाही अथवा पुढील वर्षाकरिता लागू राहणार नाही. तद्नंतर अर्ज करतेवेळी नियमानुसार अर्ज करणे आवश्यक असून सर्व सहपत्रे व शुल्कांचा भरणा नव्याने करणे आवश्यक राहील.

**८. प्रवेश पध्दती :**

८.१ शासनाने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमातील तुकडयांना नियमानुसार संस्थास्तरावर प्रवेश देण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.

८.२ तसेच शासनाने वेळोवेळी सदर प्रवेश प्रक्रिया, प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क यांमध्ये केलेल्या बदल सर्व संस्थांना बंधनकारक राहतील.

८.३ प्रवेशित विद्यार्थ्याची व्यवसाय निहाय यादी संकेत स्थळावर अपलोड करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

८.४ संस्थेने दरवर्षी प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्याचा निकाल संचालनालयाच्या संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक राहील.

**९ अवैध प्रवेश:**

व्यवसाय अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नसताना केलेले प्रवेश हे अवैध प्रवेश समजण्यात येतील व सदर संस्थेवर सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० “महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनाधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनाधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम” अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

**१० संस्थेची गुणवत्ता व सुधार प्रणाली**

१०.१ शासनाने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीचा राखण्याच्या दृष्टीने संचालनालय स्तरावरुन नियमितपणे प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रशिक्षण गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक वर्षी ७५% पेक्षा कमी निकाल असणाऱ्या संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येईल. एखाद्या संस्थेचा निकाल सतत ३ वर्षामध्ये ७५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

१०.२ शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल.

**११ जमा /खर्च :**

११.१ पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे या साठीचे आकारण्यात येणारे शुल्क प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणेच जमा करण्यात येईल.

११.१ पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करणे, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे यासाठी अर्ज मागविण्याकरिता जाहिरात प्रकाशित करणे, ऑनलाईन प्रणाली विकसित करणे, प्रत्यक्ष निरिक्षण करण्यासाठी निरिक्षण Agency ला देय असलेले शुल्क अदा करणे, बैठका आयोजित करणे इ. तत्सम बाबींवर होणारा खर्च हा प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणेच जमा असलेल्या रक्कमेतून करण्यात येईल

Santosh
Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2018.05.25 12:57:52 +05'30'

**( संतोष वि. रोकडे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**